ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ९३ वा ❑ बुधवार दि.२१ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# भारतात किती पाकिस्तानी हेर?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

भारताचं अन्न खाऊन पाकिस्तानची चाकरी करणा–यांची संख्या भारतात कमी नाही. आतात राहून पाकिस्तान साठी भारतातील संवेदनशील माहिती पुरविणाऱ्यांची संख्या भारतात दिवसेंदिवस वाढत त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होत कठोर कारवाई करण्याची गरज आहे.भारतामध्ये पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याच्या बातम्या आहेत. अनेकजण पाकिस्तानकडून आर्थिक मदत किंवा इतर कारणांसाठी हेरगिरी करत असल्याचं बोललं जातं.भारतात राहून पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्यांची संख्या किती आहे.? हा एक गंभीर प्रश्न सुरक्षा यंत्रणांसमोर उभा ठाकला आहे.भारतीय सुरक्षा यंत्रणांनी पाकिस्तानसाठी हेरगिरी करणा–यांची पाळंमुळं खोदून काढण्याची मोहीम सुरु केली. अलीकडेच

पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली यूट्यूबर ज्योती मल्होत्राची सध्या तपास यंत्रणांकडून चौकशी चालू आहे. ज्योती मल्होत्रा ही हरियाणाची रहिवासी असून देशभरात फिरून त्याचे व्हिडीओ यूट्यूबवर अपलोड करत होती. मात्र, पाकिस्तानच्या आयएसआय संस्थेला ती माहिती पुरवत होती, असा धक्कादायक खुलासा समोर आला असून आता तिच्याशी संबंधित इतर यूट्यूबर्सचीची चौकशी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर ज्योती मल्होत्राला हनीट्रॅप केलं गेलं होतं, असा दावा जम्मू–काश्मीरचे माजी पोलीस महासंचालक शेश पॉल वैद यांनी केला आहे.

पानीपत आणि भटिंडामधून दोन हेरांना भारतीय सुरक्षा यंत्रणांनी ताब्यात घेतलंय.

दोन दिवसांपूर्वी मूळची हरियाणाच्या हिसारची असणारी ज्योती मल्होत्राला पोलिसांनी अटक केली. भारताबाबतची संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप ज्योतीवर असून तिची कसून चौकशी केली जात आहे. ज्योती याआधी पाकिस्तानलादेखील जाऊन आली असून भारतातील पाकिस्तानी दूतावासातही तिचा चांगला संपर्क असल्याचं स्पष्ट झालं आहे. ज्योतीनंच गेल्या वर्षी दिल्लीतील पाकिस्तान दूतावासाकडून इफ्तार पार्टीचं विशेष आमंत्रण आल्याचं आपल्याच व्हिडीओमध्ये नमूद केलं होतं.

ज्योती मल्होत्रानं या व्हिडिओमध्ये पाकिस्तानी दूतावासातील तत्कालीन अधिकारी एहसान उर रहीम उर्फ दानिश यानं आपल्याला या पार्टीसाठी विशेष आमंत्रित केल्याचंही म्हटलं आहे. तसेच, या व्हिडीओमध्ये दानिशच ज्योतीची दिल्लीतील पाकिस्तानी दूतावासातील उच्चपदस्थांशी ओळख करून देत असल्याचंही दिसून येत आहे.

भारतातल्या दहशतवादी कारवायांना पायबंद घालण्यासाठी भारतीय लष्कर, गुप्तचर संस्था रॉ आणि आयबीनं कंबर कसलीय. भारतातून दहशतवादाचं समूळ उच्चाटन करण्याची हीच नेमकी वेळ आहे. त्यामुळंच दहशतवादाचं संपूर्ण नेटवर्क उद्ध्वस्त करण्याचा विडाच सुरक्षा यंत्रणांनी उचललाय. याचसोबत पाकिस्तानसाठी हेरगिरी करणा–या हेरांचं नेटवर्कही उखडून फेकण्याची तयारी भारतीय सुरक्षा यंत्रणांनी केलीय.

पंजाबच्या भटिंडामधून एका हेराला अटक केली असून रकीब असं या हेराचं नाव आहे. रकीब मूळचा हरिद्वारच्या डोसनी गावचा रहिवासी असून भटिंडात तो टेलरिंगचं काम करायचा.लष्कराच्या केन्टोनमेंट परिसराची तो माहिती गोळा करायचा. उत्तराखंडमध्ये राहणारा रकीब पाकिस्तानसाठी हेरगिरी कधी करु लागला याचा यंत्रणा आता तपास करता आहे.


हरिद्वारचा तरुण पाकिस्तानसाठी हेरगिरी करत असल्याची माहिती धक्कादायक असल्याचं माजी मुख्यमंत्री आणि खासदार त्रिवेंद्रसिंह रावत यांनी म्हटलंय आरोपीला कठोरात कठोर शिक्षा करण्याची मागणीही त्यांनी केलाय.

पानीपतमधूनही नोमान इलाही नावाच्या एका हेराला सुरक्षा यंत्रणांनी अटक केलीय. नोमान इलाही त्याच्या बहिणीच्या घरी राहत होता. मुळचा यूपीच्या शामली भागातील कैराना इथला तो रहिवासी होता. तो पानीपतमध्ये राहून पाकिस्तानसाठी हेरगिरी करायचा. पोलिसांनी त्याच्या कैराना इथल्या मूळ गावातही चौकशी सुरु केलीये. सीमावर्ती भागात पाकिस्तानच्या आयएसआयचं मोठं जाळं असण्याची शक्यता आहे. या हेरांमार्फत भारताच्या लष्करी सज्जतेची आणि लष्करी हालचालींची माहिती पाकिस्तानपर्यंत पोहचवण्याचं काम केलं जातं. आता भारतीय सुरक्षा यंत्रणांनी हेरांचं जाळं उद्ध्वस्त करण्यास सुरुवात केली आहे.

# डॉ.जयंत नारळीकर काळाच्या पडद्याआड

**ज्योतिर्मय साहित्य**

जगप्रसिद्ध खगोल – भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे काल म्हणजे २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही.



विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. डॉ जयंत नारळीकर यांना भावपूर्ण श्रद्धाजली !

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जि.पुणे**

# उपमुख्यमंत्री मा.अजित दादा पवार यांच्या हस्ते प्रतिबिंब नियतकालिकाचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – विद्यार्थी व शिक्षकांच्या समग्र लेखणी आणि अनुभवातून दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या बाबुरावजी घोलप महाविद्यालयाच्या प्रतिबिंब या वार्षिक नियतकालिकाचे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.अजितदादा पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्रजी घाडगे, मानद सचिव व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य ॲड. संदीप कदम, उपसचिव एल. एम. पवार, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, सहसचिव (प्रशासन) ए.एम. जाधव, सतीश मगर, संदीप जगधने तसेच नियतकालिक संपादक डॉ. विजय बालघरे, सदस्य कॅप्टन डॉ. विठ्ठल नाईकवाडी, डॉक्टर वैशाली बनसोड,डॉ. शिवाजी शेळके आदी उपस्थित होते.

सदर नियतकालिक हे आमची माती, आमचा देश या संकल्पनेवर आधारलेले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उपजत प्रतिभेला व लेखनाला एक मुक्त व्यासपीठ देण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी यामध्ये आपला गाव, देश,संस्कृती, संत–महंत, भाषा, समाजसुधारक, खेळाडू, कलाकार, लेखक, समृद्ध परंपरा, अमर जवान तसेच महाराष्ट्र व देशातील विविध घटक इत्यादी विषयावरील लेखांचे लेखन केलेले आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व संस्थेचे अध्यक्ष मा. ना.अजितदादा पवार यांनी नियतकालिकाचे मुखपृष्ठ, संकल्पना यांचे विशेष कौतुक भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण देशामध्ये राबविण्यात आलेल्या मेरी माटी, मेरा देश अभियानाच्या पार्श्वभूमीवर केले. महाविद्यालयाने आमची माती, आमचा देश या महत्वपूर्ण विषयावर युवावर्गाच्या भावना व विचारांना नियतकालिकाच्या



माध्यमातून खुले व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल महाविद्यालयाला शाबासकीची थाप दिली. तसेच राष्ट्रउभारणीसाठी यापुढे देखील विविध समाजोपयोगी विषयावर प्रतिबिंब च्या माध्यमातून युवा वर्गाचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

या नियतकालिकाच्या उत्कृष्टतेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संगीता जगताप, प्रणित (सनी) पावले सर्व विभागप्रमुख, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# कला शाखा ठरते विज्ञान आणि वाणिज्य शाखेला भारी

**ज्योतिर्मय साहित्य**

थांबा ! विज्ञान व इतर शाखांच्या मागे धावणाऱ्या विद्यार्थी व पालकांनो एकदा अवश्य वाचा.... प्रत्येक विद्यार्थी व पालकांना सरकारी नोकरी मिळावी असे वाटते पण सध्या सरकारी नोकऱ्या मिळवणे अवघड होत आहे असे असले तरी अन्य शाखांच्या तुलनेत कला (आर्ट्स) शाखेच्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकरीचा जास्त संधी मिळत आहेत.

सध्या गाव तिथे शाळा आणि गल्ली ते सायन्स कॉमर्स कॉलेज निघाले आहे पैसे मोजले की सहज प्रवेश मिळतो परंतु अशा कॉलेजची गुणवत्ता किती? हा प्रश्नच आहे लाखो रुपये खर्च करून सायन्सला जाऊन डॉक्टर होण्याचे अनेकांची दिवस स्वप्न ठरत आहे डिप्लोमा व इंजिनिअरिंग कॉलेजच्या दरवर्षी ४० टक्के जागा रिक्त राहत आहे जे उत्तीर्ण होतात त्यांच्यापैकी फक्त पंधरा टक्के विद्यार्थ्यांना चांगल्या नोकरी लागतात इतरांना मात्र आठ दहा तास राबवून १५ ते २० हजारांपेक्षा जास्त पगार मिळत नाही. कला शाखेत शिक्षण घेणारे विद्यार्थी फक्त डॉक्टर इंजिनिअर होऊ शकत नाहीत मात्र अन्न प्रत्येक क्षेत्रात कला शाखेत विद्यार्थी जाऊन यश मिळवत आहे. कॉमर्स कडे जाऊन सीए सीएस होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी हजारात एखाद्यालाच हे यश प्राप्त होते. मात्र आता कला शाखेचा विद्यार्थी सीए होऊ शकतो. बँकेत नोकरी मिळू शकतो. कला शाकाहारी वैद्यकीय अभियांत्रिकी शाखेसारखी खर्चिक नाही शिवाय अभ्यासाचे तास, शिकवण्याचे प्रात्यक्षिके यासारखे तगादे कला शाखेत नाहीत. शिवाय कला शाखेतील इतिहास भूगोल राज्यशास्त्र समाजशास्त्र अर्थशास्त्र या विषयांचा अभ्यास केला तर तोच अभ्यासक्रम स्पर्धा परीक्षेसाठी असतो त्यामुळे कला शाखेत प्रवेश घेतल्याचा हा एक फायदा आहे.

**शैक्षणिक**

*प्रा. महादेव खोत.*
*आर पी डी महाविद्यालय बेळगाव.*



सायन्स व कॉमर्स शिक्षणासाठी मोठा पैसा लागतो त्या तुलनेत कला शाखेचे शिक्षण कमी खर्चात होते आजचा अभ्यास करून त्या तुलनेत अत्यंत सोपा असल्याने त्याला लवकर आत्मसात होतो आणि कॉलेजच्या वयातच सरकारी नोकरी मिळवू शकतो. अभियांत्रिकी वैद्यकीय विज्ञान कृषी व संगणक शास्त्र या विषयात पदवी करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची दिवसभर धावपळ सुरू असते सकाळी नऊ ते सायंकाळी सहा पर्यंत प्रॅक्टिकल्स जादा तास गृहभ्यास त्यामुळे त्यांना पदवी परीक्षेच्या अभ्यासाबरोबर स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करता येत नाही याउलट कला शाखेत उरलेल्या वेळेत लहान–मोठे कोर्सेस करून व्यावसायिक कौशल्य प्राप्त करता येते. कला शाखेचे कॉलेज हे तीन ते चार तासात आटोपते ते विद्यार्थी उर्वरित वेळ लहान मोठ्या स्पर्धा परीक्षण साठी उपयोगात आणू शकतात वेळ असल्यामुळे ते इतर कार्यक्रमात (वादविवाद व्याख्याने चर्चासत्र वृत्तपत्र व नियतकालिकांचे वाचन) सहज भाग घेऊ शकतात याशिवाय कला शाखेतील विद्यार्थ्यांना विविध उपक्रमाच्या माध्यमातून काही कौशल्य प्राप्त होतात त्यांच्या व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत होते भाषण संभाषण मुलाखतीचे तंत्र क्रीडा सुंदर हस्ताक्षर लेखन अवांतर वाचन याचा स्पर्धा परीक्षेला व व्यक्तिमत्व विकासाला फायदा होतो. प्रत्येक सरकारी नोकरीत निवड होण्यासाठी मुलाखत द्यावी लागते तेव्हा कला शाखेचा विद्यार्थी तेथे सरस ठरतो.

**विद्यार्थ्यांची पसंती**

अकरावी प्रवेशाच्या बाबतीत आपण गेल्या दहा वर्षावर नजर टाकली, तर एक गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ दिसायची. ती म्हणजे अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी काही अपवाद वगळता आधी विज्ञान शाखेची निवड करतात. मग तिथली यादी संपल्यावर पुढे वाणिज्य आणि कला यांना पसंती देत होते. आपल्या समाजात काही समीकरणे जरी बरोबर नसली तरी रुढ होऊन बसली होती, ती म्हणजे उत्तम गुण (८५–१०० टक्के हा टप्पा) म्हणजे हुशार विद्यार्थी आणि अशा विद्यार्थ्यांनी प्रथम विज्ञान शाखेला जायचे. विशेष म्हणजे जास्त गुणवत्ता यादीतील विद्यार्थी विज्ञान शाखा डावलून कला शाखेला गेल्याची उदाहरणे अल्प असायची. अलीकडे या पारंपरिक दीर्घकालीन समीकरणांना जोरदार छेद दिलेला दिसतो. उत्तम गुण असणारे विद्यार्थी यंदा चक्क कला शाखेला पसंती देत आहेत.





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

## आनंदी पहाट...


### पवित्रता शोधण्याची गरज अधिक महत्व:ची

ज्योतिर्मय साहित्य

संस्कृती, समुदाय, आध्यात्म किंवा धार्मिकता यांच्याशी आपला संबंध समाविष्ट केलेला असू शकतो आणि आम्ही धरत असलेल्या श्रद्धा, मूल्ये, मानसिक धारणा आणि नैतिकता समाविष्ट करू शकतो. आध्यात्मिक व्यक्ती असणे ही बाब व्यक्ती असण्याचे समानार्थी आहे, ज्याचे सर्वोच्च ध्येय स्वतःवर आणि इतरांवर प्रेम करणे आहे. आपण सर्व एक आहोत ही त्याची खात्री, त्याला सर्वांच्या कल्याणासाठी कार्य करण्यास आणि कोणत्याही हानिकारक क्रियाकलापांपासून दूर राहण्यास प्रवृत्त करते. जीवनाचा अर्थ जाणून घेणे हे बहुतेकांसाठी आध्यात्म महत्त्वाचे असण्याचे मुख्य कारण आहे. आध्यात्मवाद, काहीतरी पवित्रता शोधण्यासाठी, लोकांना एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करते. एक व्यक्ती म्हणून तुम्ही कोण आहात यावर चिंतन केल्याने सर्वसाधारणपणे मानवी अस्तित्वाचा अर्थ काय याविषयी तुमचे ज्ञान वाढू शकते.

प्रार्थना, मंत्र आणि ध्यान यांसारखे आध्यात्मिक आरोग्य लागू करण्याचे अनेक मार्ग आहेत. आध्यात्मिक विकास हा अंशतः एखाद्याचा अंतर्बाह्य गतिमान प्रवास परस्पर प्रक्रिया आहे. या क्रमिक वाढीमध्ये सामान्यत: विकासाच्या तीन टप्प्यांचा समावेश होतो; शुद्धीकरण अवस्था, प्रकाशमय अवस्था आणि एकात्मक अवस्था ह्या होत. आपल्या मानवी विकासाच्या टप्प्यांचे ते प्रतिबिंब दाखवतात जसे, बालपण, किशोरावस्था आणि प्रौढत्व ही होय. आपल्या आध्यात्मिकतेत आपण स्वत: आपल्या सर्वात सुंदर आणि शक्तिशाली स्वरूपात जीवनाचा प्रवास करत असतो. आध्यात्म आपल्याला शांतता, जीवनाचा उद्देश आणि क्षमा या भावना देऊन तणावाचा सामना करण्यास मदत करू शकते. भावनिक ताणतणावाच्या वेळी किंवा आजारपणाच्या वेळी ते अधिक महत्त्वाचे बनते. अर्थाच्या निर्मितीमध्ये आध्यात्मिक मूल्यांमध्ये ऊर्जा, विकास आणि आशा यांचा स्त्रोत निर्माण करणे समाविष्ट आहे.

## वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे...




ज्योतिर्मय साहित्य

हो राजेश, वड, पिंपळ यासारखी झाडे खूप वर्षे जगतात. हे अक्षय वृक्ष आहेत. यांना पवित्र मानून त्यांची पूजा केली जाते.

राजेशची आई शाळेत विज्ञान विषय शिकवायची. ती म्हणाली, राजेश, पिंकी , तुम्हाला माहिती आहे का की वड, पिंपळ, औदुंबर, चिंच, कडुलिंब यासारखी झाडे वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात आणि आपल्याला शुद्ध प्राणवायूचा पुरवठा करतात. पिंपळ वातावरणातील १००% कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतो तर वड आणि कडुलिंब अनुक्रमे ८० आणि ७५ टक्के कॉ डा ऑक्साईड शोषून घेतात. वातावरण शुद्ध करणाऱ्या या निसर्गाच्या गाळण्याच आहेत. अरे वा, झाडे किती उपयोगी पडतात मानवाच्या ! राजेश म्हणाला.



अगदी बरोबर आहे राजेश, बाबा म्हणाले. पण राजेश आणि पिंकी तुम्हाला सांगतो की ही सगळी आपली देशी झाडं बरं का ! पर्यावरण शुद्धीसाठी ही फार मदत करतात. पण गुलमोहर, निलगिरी यासारखी झाडे मात्र या दृष्टीने फारशी उपयोगाची नाहीत. या झाडांची सावली फारशी पडत नाहीत. या झाडांवर पशुपक्षीही घरटे करत नाहीत. पण जे पशुपक्षांना कळते, ते मानवाला मात्र कळत नाही. बाळांनो, तुम्ही थोडावेळ आईशी बोला. तोपर्यंत मी जवळपास आणखी काही बघण्यासारखे आहे का त्याचा तपास करतो. असं म्हणून श्यामराव तिथून निघाले.

श्यामलाताई म्हणाल्या, बाळांनो, वड, पिंपळ, कडुलिंब, औदुंबर आणि आपली सगळीच झाडे अतिशय औषधी आहेत बरं का ! ते आपल्याला ऑक्सिजन तर देतातच पण आपले अनेक आजारही बरे करतात. कडुलिंबाच्या काडीने नियमितपणे दात घासल्यास दातांना कीड लागत नाही. पिंपळाची पाने तर किती सुंदर असतात. हृदयाच्या आकाराची ! जेव्हा नवीन पालवी फुटते तेव्हा ते छान गुलाबी, तांबूस असतात. मग हिरवी होतात. त्यांची सळसळ, वाऱ्यावर डोलणं किती मनमोहक असतं. पिंपळाची पाने, साल आणि मुळे औषधी असतात. पोटाच्या आजारांवर त्यांचा उपयोग होतो. पिंपळ पानांचा काढा आपले शरीर डिटॉक्स करतो म्हणजे त्यातील दोष किंवा टॉक्सिन्स काढून टाकतो. पिंपळाची फळे पक्षांचे आवडते खाद्य आहे. या वृक्षाला अश्वत्थ वृक्ष असेही म्हटले जाते. याचा उल्लेख भगवद्गीतेत सुद्धा येतो. गौतम बुद्धानी याच वृक्षाखाली तप केले. त्यांना त्या ठिकाणी दिव्य ज्ञानाची प्राप्ती झाली म्हणून त्या वृक्षाला बोधिवृक्ष असेही म्हटले जाते. बिहारमधील बोधगया येथे हा वृक्ष आहे.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


### वैराग्य निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

४) भयानक जिव्हा काढते माझे माझे करून फुकट मरून जाते. डोक्यावर ओझे घेऊन बुडतो.ज्ञानाचा अभाव असतो, अहंकाराचा डोलारा जबरदस्त असतो की अहंतेचा बुद्धीवर अंमल म्हणून अंधार, चोर भुतबाधा, द्रुष्यात अडकला म्हणून भोवरा यासर्व चक्रात सापडला म्हणजे भोवर्यात अडकला व मेला.

सज्जन वाचक मित्रांनो म्हणून समर्थानी संसाराला महापूराची ऊपमा दिली आहे. सज्जन वाचक मित्रांनो वैराग्य निरूपण करत असताना मला असे जाणवत आहे की मी जे निरूपण करत आहे त्या तर माझ्या अवतीभोवती घडत आहेत. सहाव्या ओवी पर्यन्त आपण आलो होतो. आता सातव्या ओवी कडे वळूयात. मी वरती म्हणले आहेच की समर्थानी संसाराला महापूराची ऊपमा दिली तर जन्मलेल्या प्रत्येक माणसाला या महापूराच्या भोवर्यात सापडावेच लागते त्यातून कोणाचीही सुटका नाही. पण जो अशा प्रसंगी भगवंताला शरण जातो त्याच्या रक्षणाची जबाबदारी भगवंत घेतो. तो पैलतीरावर तुम्हाला सुठरूप नेऊन पोहचवतो. मात्र ज्यांचे अंतकरण शुध्द आहे. त्यालाच भगवंत सहाय्य करतो हे लहात ठेवणे गरजेचे आहे. अशा लोकांना दु:ख वाट्याला येत नाही असे नाही, ते प्रत्येकाला येते पण त्या दु:खाची दाहकता कमी असते. संत वा:ड्मयाचा अभ्यास करत असताना मला जाणवलेली भक्तीची व्याख्या श्रोत्या समोर मांडण्याचा प्रयत्न करते. भाव व भावार्थ हे दोन शब्द नेहमीच संत वा:ड्मयात ऐकायला मिळतात. भाव शब्द भू धातूपासून बनतो भू, म्हणजे होणे किंवा असणे. भाव म्हणजे अस्तित्व. भावार्थ म्हणजे वस्तूच्या अस्तित्वात सामावलेला अर्थ. ईश्वरी श्रद्धा म्हणजे भाव. वस्तूंच्या अस्तित्वात अंतर्भूत असलेला सर्व अर्थ म्हणजे भावार्थ होय. भावार्थ भक्ती असली म्हणजे आचार, विचार, ऊच्चार, वाणी, कोमलता, सौहार्दपूर्ण आचरण, संतवाक्यावर भरोसा, हे सर्व ईश्वर साक्षी ठेवून वागणे. म्हणजे सदाचरण होय.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नाम घेण्याला काहीही आड येत नाही

ज्योतिर्मय साहित्य

आपण असे पाहू की नामात प्रेम येण्याकरता एक एक सत्कर्म करीत राहणे सुलभ, की ते नामच विचाराने, सर्व संतांनी कळवळ्याने सांगितले आहे म्हणून, जरूर तर बळजबरीनेसुद्धा घेत राहणे हे सुलभ. समजा एक यंत्र आहे त्यात पुष्कळ चक्रे आहेत, आणि ते यंत्र चालू करण्याचा हेतू धरला आहे. आता एखाद्याने त्यातले एखादेच चक्र चालू करू म्हटले तर ते चालू होईलच असा भरवसा नाही. पण त्या सर्व चक्रांचा संबंध असणारी कळ आपण दाबली तर मात्र बिनतक्रार आणि अत्यंत अल्प प्रयासाने ते यंत्र सहज चालू करता येईल. त्याप्रमाणे, नाम ही कळ जर धरली तर सत्कर्मरूपी सर्व चक्रे एकदम फिरू लागून आपले काम निश्चितपणे आणि सुलभपणे होईल. म्हणून, हमखास आणि सहज रीतीने काम व्हावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने कशाही रीतीने का होईना नाम घ्यायला लागावे. नाम घ्यायचे एकदा पक्के ठरविले म्हणजे काहीही आड येत नाही. व्यवहारात आपण पाहतोच की एखादी गोष्ट समर्थनीय नसली तरी करायचा निश्चय केला की मनुष्य ती करतोच. मग नाम घेण्याचा निश्चय केला तर का नाही होणार ? काहीही केले तरी शेवटी नामाशिवाय गत्यंतर नाही; तर मग ते घेण्यात विलंब किंवा चालढकल करण्यात काय अर्थ आहे ? म्हणून कोणत्याही तऱ्हेच्या शंकाकुशंका न घेता कशाही तऱ्हेने पण नाम घेत राहावे हे उत्तम; म्हणजे विनाकारण काळ फुकट घालविला अशी पश्चात्तापाची वेळ येणार नाही.

जग हे अनेक मोहक वस्तूंनी भरले आहे. त्या वस्तू आपण पाहिल्या किंवा नुसत्या ऐकल्या तरी हव्याशा वाटतात; आणि त्या मिळविण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणून देवाजवळ आपण अशी प्रार्थना करावी की, देवा मोहक वस्तू मला दाखवूच नकोस, कारण माझी इच्छा तिकडे जाईल आणि मी फसेन. देवा, माझे खरे हित आहे तेच मला दिसो, तेच मी ऐको, त्याचेच मला स्मरण होवो, आणि त्याचीच मला गोडी लागो.

प्रल्हाद द्रौपदी यांसारख्या भक्तांनी देवाजवळ काय मागितले ? तेच आपण मागावे, आणि त्यांनी निष्ठा ठेवली तशीच आपणही ठेवावी. त्यांच्या ठिकाणी जसे वैराग्य होते, तसे आपल्या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न करीत असताना प्रथम चुका होतील पण त्या झाल्या तर पश्चाताप व्हावा. देवा, मी फार दोषी, अपराधी आहे, मला क्षमा कर आणि तुझ्या कृपेला पात्र कर. पश्चाताप खराच झाला तर राम कृपा करीलच. मुखाने नाम घ्यावे, हाताने प्रपंचाचे काम करावे, आणि अंत:करणात समाधान ठेवावे.

जो नाम घेऊ लागेल त्याचे मन बाहेर धावण्याचे हळूहळू कमी होते.

***


## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत श्री भानुदास महाराज

ज्योतिर्मय साहित्य

निभ्रांत
तुज पाहू जाता नये कांहीं हातां ।
अससी तत्त्वतां साध्य नाहीं ।।१।।
तुझा तूंचि मागें परतोनि पाहें ।
तुजपाशीं आहे भुलुं नको ।।२।।
पिंडीं तें ब्रह्मांडी बोलताती वेद ।
होई तूं सावध भुलूं नको ।।३।।
भुललिया माया श्रम तुज झाला ।
फिरसी वेळोवेळां चौर्यायंशी ।।४।।
चौर्यायंशी आवर्तनें होती गा तुज ।
सांगतसे गुज जीवीं धरा ।।५।।
भानुदास म्हणें सदगुरु कारणें ।
पुरवील तुमचें पेणें निश्चयेंसीं ।।६।।



संत श्रेष्ठ भानुदास महाराज हे शांती ब्रह्म एकनाथ महाराजांचे पणजोबा होते. तेही विठ्ठल भक्त होते. त्यांचा कालावधी हा इसवी सन १४४५ ते १५१३ या दरम्यानचा आहे. असे म्हणतात की, त्यांनी विजयनगरला नेलेली पांडुरंगाची मूर्ती पंढरपूरला परत आणली, आणि तिची पुन्हा प्रतिस्थापना केली.

त्यांनी अत्यंत सचोटीने कापडाचा व्यापार केला आणि त्यासोबत पंढरपूरची वारी नित्य नियमाने त्यांनी केली. त्यांच्या भक्तीतून फुललेला वरील अभंग आपण आज अवलोकनार्थ घेऊयात.

तुज पाहु जाता/न ये कांहीं हाता//
असशी तत्वता साध्य नाही//

जगातील बहुतेक सगळ्या पूजा पद्धती ह्या परमात्म्याचा शोध बाहेर घेतात. कांही पूजा पद्धतीत परमात्मा आकाशात असावा म्हणून त्यास ''उपरवाला'' किंवा ''आकाशातील बाप'' या नावेही संबोधले जाते.

आपल्या सनातन पद्धतीत बाह्य जगतातील शक्तीमध्ये स्थानामध्ये, मूर्तीमध्ये भगवंत हुडकण्याचे प्रयत्न फार पुर्वीच संपले. तेव्हा पासूनच त्या परमात्म्याचा अंतरंगात शोध घ्यायला सुरुवात झाली.

सनातन पूजा पद्धतीत मूर्तिपूजा महत्त्वाची समजली जाते व परमेश्वरा प्रति आपली भक्ती वाढावी, तो मुर्तीत आहे तसा दिसत असावा हे अनुमान बांधता यावे म्हणून मूर्ती पूजा ही आवश्यक आहे. आपण परमात्म्याला त्या मूर्ती तो आहे असे मानतो व हे आपल्या भक्तीची रुजूवात होण्यासाठी आवश्यक ही आहे.

पण परमात्मा हा बाह्य जगतात हुडकून सापडणार नाही, म्हणून फार पूर्वी काळापासूनच परमात्म्याचा शोध हा अंतरंगात घ्यायला सुरुवात झाली. इथेही भानुदास महाराज म्हणतात परमात्म्याला आपण बाह्य जगतात पाहू गेलो तर आपले प्रयत्न हे निष्फळ ठरतील व हाती काहीही येणार नाही. असे प्रयत्नातून काहीही सिद्ध होत नाही म्हणून परमात्म्याचा शोध हा अंतरंगात घ्यायला हवा. (क्रमशः)



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**सृजति तावदशेषगुणाकरं पुरुषरत्नमलङ्करणं भुवः ।**
**तदपि तत्क्षणभङ्गि करोति चेद् अहह कष्टमपण्डितता विधेः।।**

अर्थ – विधाता पृथ्वीस अलंकारूप, गुणनिधी अशा नररत्नांना उत्पन्न करतात. परन्तु त्यांच्या जीवनास क्षणभंगूर बनवतात. अहा! विधात्याची ही मूर्खता किती कष्टप्रद आहे?

गुणी माणसे अल्पायुषी असतील, तर ते कसे जगासाठी अनुपयुक्त किंवा हानिकारक ठरते, याचे वर्णन भर्तृहरींनी या श्लोकात केले आहे.

**नमस्यामो देवान्ननु हतविधेऽस्तेऽपि वशगा**
**विधिर्वन्द्यः सोऽपि प्रतिनियतकर्मैकफलदः।**
**फलं कर्मायत्तं यदि किममरैः किञ्च विधिना**
**नमस्तत्कर्मभ्यो विधिरपि न येभ्यः प्रभवति ।।**

अर्थ – आम्ही देवांना प्रणाम करतो, परन्तु ते दुष्ट विधात्याच्या वश आहेत. विधात्याला वंदनीय मानले, तर ते आम्हाला आमच्याच कर्माची फळे देणारे आहेत. जर फळ कर्मानुसारच प्राप्त होते, तर विधाता किंवा देवांशी काय प्रयोजन? ज्याला विधाता देखील प्रभावित करू शकत नाहीत, त्या कर्मासच नमस्कार आहे. या श्लोकात भर्तृहरींनी कर्माच्या भूमिकेचे श्रेष्ठत्व स्पष्ट केले आहे. जर कर्मानुसार फळ मिळणार असेल, तर कर्मच श्रेष्ठ होय अशी भूमिका येथे भर्तृहरींनी मांडली आहे.

## ॥श्री राम कथा॥



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

एक माणूस घरा बाहेर ओट्यावर सकाळी तोंड धूत बसलेला असे.त्याच वेळी रस्त्याने गाई, म्हशी जात.त्यातील एका म्हशीच्या शिंगांचे वर्तुळ झालेले होते.याला असा विचार आला की, शिंगातून आपणास उडी मारता येईल काय? त्याने पोटाचे व शिंगांचे माप घेतले.त्याने म्हशीच्या शिंगातून उडी मारण्याचा प्रयोगच केला. त्या शिंगातून ऊडी तर घातली. डोके शिंगातून बाहेर पडले पण कमर अडकून पडली. धड याही बाजूने बाहेर येता येईना आणि त्याही बाजूने बाहेर येता येईना. मग लोकांनी कसेबसे त्यास ओढून बाहेर काढले. खूप जखमी अवस्थेत त्याला वाचविले गेले. लोक त्यास म्हणाले कांहीं विचार करायचा की ? अशी उडी मारते काय कोणी?तो म्हणे अहो मागच्या सहा महिन्या पासून हाच विचार करतोय ! आता या शिंगातून उडी मारायची काही आवश्यकता होती काय? या विचाराला ते विचारच म्हणत नाहीत.हा अविचार झाला. प्रपंच हा विचारचा विषय असतो ,हे वेदांताला मान्य नाही. कारण अविचारानेच प्रपंच होतो. व विचार हा परमार्थासाठीच असतो हे सिद्ध होते. विचारीत निसटले सहजी सांडले विचारी पुरुषाला प्रपंचाचे बंधन असू शकत नाही. विषयाबद्दलचे चिंतन म्हणजे अविचार आणि परमार्थ हा बद्दलचे चिंतन म्हणजे विचार आपणास विचार करायला सांगितले आहे अविचार नाही. जगी सर्व सुखी असा कोण आहे? असे समर्थ म्हणतात व तेच या प्रश्नाचे उत्तरही असे देतात. विचारी मना तूची शोधून पाहे विचारी मनाला सर्व सुख मिळते हे उत्तर त्यांनीच दिले. (क्रमशः)

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886



## आरोग्य संजीवनी

### हिरवे हरभरे खाण्याचे फायदे


ज्योतिर्मय साहित्य

आजही खेड्यापाड्यात लोक हरभर्याची डाळ मोठ्या उत्साहाने खातात.

हिरवे हरभरे हे प्रथिने, कार्बोहायड्रेट, फायबर, लोह, कॅल्शियम आणि जीवनसत्त्वे यांसारख्या पोषक तत्वांचा चांगला स्रोत आहे. हिवाळ्यात शरीराची कमी होत जाणारी प्रतिकारशक्ती वाढवण्याचे काम करते. त्यामुळे सर्दी, ताप यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका कमी होतो. हिरवा हरभरा शरीराचे वजन वाढविण्यावर देखील परिणाम दर्शवतो. यामध्ये असलेले फोलेट मूड स्विंग, चिंता आणि नैराश्य टाळते.

१. हिरवे हरभरे फायबरचा चांगला स्रोत आहे. फायबरच्या कमतरतेमुळे पोटाची पचनक्रिया बिघडू लागते. यामुळे अनेक वेळा शरीरातील चरबी झपाट्याने वाढू लागते. फायबरमुळे बद्धकोष्ठता आणि पचनाशी संबंधित समस्या दूर होतात आणि चरबी लवकर कमी होते.

२. हरभऱ्याचे सेवन केल्याने शरीरात ब्युटीरेट नावाचे एक संयुग तयार होते, जे कर्करोगाच्या पेशींचा वाढता धोका कमी करण्यास मदत करते. यासोबतच हरभऱ्यामध्ये असलेले फोलेट आणि व्हिटॅमिन बी९ मूड स्विंग्सवर प्रभाव दाखवतात. यासोबतच ते चिंता आणि नैराश्याशी लढण्यास मदत करते.





संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

३. हरभऱ्याच्या सेवनाने हृदय निरोगी राहते. यामध्ये असलेले मॅग्नेशियम आणि पोटॅशियम रक्तदाब नियंत्रणात ठेवते. यासोबतच यातील प्रोटीनमुळे केसांच्या वाढीवरही परिणाम होतो. हे केसांची चमक टिकवून ठेवते आणि केस गळणे टाळते. हरभरा हिरव्या भाज्या मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहेत.

४. खेड्यापाड्यात लोकांना हिरवा हरभरा थेट विस्तवावर भाजून खायला आवडतो, हरभऱ्याच्या शेंगा वेगळ्या करून काही लोक बाजारातून विकत घेऊन त्याची भाजी खातात.

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

ती आभूषणे म्हणून रक्तकरबीची फुले परिधान करीत असते. रंजन नावाच्या तिच्या प्रियकराची आठवण म्हणून ती ही आभूषणे परिधान करीत असते. नंदिनी ही निसर्गाच्या सौंदर्याचे, प्रदूषण मुक्त वातावरणाचे, खळाळत वाहणाऱ्या सुंदर नदीचे जणू मूर्त रूप आहे. स्वतः पडद्याआड सुरक्षित राहून श्रमिकांचे शोषण करणाऱ्या राजावर ती कडाडून टीका करते. या नाटकातून सत्ताधीश श्रमिकांचे कसे शोषण करतात ते रवींद्रनाथांनी दाखवले आहे. सुरुवातीला या नाटकाचे नाव यक्षपुरी असे होते. ते प्रवासी नावाच्या एका मासिकात आधी प्रसिद्ध झाले होते.

रवींद्रनाथांची अशी धारणा होती की पुरुष सारखा सुखाच्या मागे धावत असतो. सुखाच्या शोधासाठी तो नवनवीन शोध लावत असतो. त्याची त्यासाठी सतत धावपळ सुरू असते. कितीही नवीन शोध लावले तरी त्याचे नवीन शोधाकडे धावणे सुरूच असते. त्याची ही धावपळ न संपणारी असते. पण या धावपळीत तो जगणे विसरून जातो. असे वेळी स्त्री त्याच्याकडे आपले निर्व्याज प्रेम, आपल्या नाजूक आणि कोमल भावना घेऊन येते. त्याच्या त्या रुक्ष आणि धावपळीच्या जीवनात ती चैतन्य आणि आनंद आणते. त्याची सतत ओढ असते ती बाहेरच्या दिशेला आणि तिची ओढ असते ती आतल्या दिशेला. तो जणू जडाचं प्रतीक आणि ती म्हणजे चैतन्य आणि आनंदाचं प्रतीक. पुरुष आणि स्त्री जेव्हा एकत्र येतात, तेव्हाच संसाराला परिपूर्णता प्राप्त होते. स्त्री शिवाय पुरुष अपूर्णच ! ती प्रेम आणि आनंद घेऊन येते. पुरुषी शक्तीचा जड आघात सोसते. अंतरात रक्त स्त्रवत असतानाही तो त्रास सोसून ती आनंदरुपी पुष्प घेऊन येते. तिच्या स्त्रवणाऱ्या रक्ताच्या लाल रंग त्या लाल कण्हेरीप्रमाणे किंवा करबी पुष्पाप्रमाणे तिच्या आनंदपुष्पावरही उमटतोच पण त्याला रक्ताचा दर्प नसतो. हाच तिचा सर्वोच्च त्याग, तिची महत्ता तिची थोरवी असते. जडाचे चैतन्याशी मिलन झाल्याशिवाय मुक्ती नाही, परिपूर्णता नाही असेच त्यांना जणू यातून सुचवायचे आहे.

या नाटकाचे देशात आणि परदेशात अनेक ठिकाणी प्रयोग झाले. टीकाकारांनी गौरवलेले हे रवींद्रनाथांचे अतिशय लोकप्रिय असे नाटक आहे. या नाटकावर अनेक चित्रपट देखील निघाले लंडनमध्ये रेड ऑलीएंडर या नावाने या नाटकाचे प्रयोग झाले.

रथेर रशी हे देखील प्रतिकात्मक नाटक आहे. रथेर रशी म्हणजे रथाची दोरी. विविध धार्मिक कारणांमुळे विविध ठिकाणचा रथोत्सव आपल्याला माहिती असतो. अनेक भाविक श्रद्धेपोटी या रथाची दोरी ओढत असतात. या नाटकात देखील असाच एका गावी रथोत्सव असलेला दाखवला आहे. यात सामील होण्यासाठी लांबून लांबून लोक येत आहेत.



## जात्यावरच्या ओव्या......

### शेती विषयक

*दादा तुझा बैल*
*मांडी घालून बसला*
*नादानं बाळ माझं*
*धनी मनात हसला ||८३||*

*पोळ्याचे दिवशी*
*वेशीबाईला तोरण*
*बैल दादाचा हरण*
*गेला वेशीच्या वरून ||८४||*

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## फुलमाला....



### कुंदा...

*गुलाबी रंगाची कुंदा कळी*
*पण फुलांचा शुभ्र साजरा*
*केश संभाराला खुलवितो*
*सुगंधित हा सुबक गजरा*

*कुंदेच्या फुलांच्या माळा*
*वाहतात नित्य देवावरी*
*मंद मंद यांचा गंध मात्र*
*दरवळत राहतोच अंतरी...*


सौ.माधुरी म.इनामदार, मिरज..

# पुस्तकाशी मैत्री, जीवनाची खात्री...

**ज्योतिर्मय साहित्य**

जीवनाच्या वाटेवर जपा लेखनाची गोडी
अनुभव भरण्याने तारेल अबोल होडी

अगं!ऐक ना छाया,मला ययाती,मृत्युंजय,छावा वाचायला खूप आवडतात,उद्या शाळेतून येताना तुझ्या ग्रंथालयातून घेवून ये ना ....पुन्हा- पुन्हा वाचावशी वाटतात गं ! असा आई-बाबांचा दिलखुलास संवाद छोट्याश्या मायाच्या कानावर पडला.बाबा, आईला पुस्तके घेवून या म्हणत होते.आईही हो म्हणाली...तिच्या चेहऱ्यावरचा आनंद३ ओसंडून वाहत होता.यांच्या बरोबर मी ही पुस्तके पुन्हा वाचेल..याचा तिला मनोमन आनंद होत होता.



बाबांनी पुन्हा सकाळी शाळेत जाण्याआधी आठवण करून दिली..न विसरता पुस्तके घेवून ये.आईने हलकेसे हास्य ओठांवर आणून शाळेत गेली.बाबा,बाबा तुम्ही काय करतात?ही डायरी कशाची आहे?कोणाची आहे?बाबांनी कपाटातून डायरी काढून चिमुरड्या मायाला ती छान डायरी दाखविली.आवडलेली वाक्ये,संवाद,कथा,दैनंदिन घटना यात ते लिहीत होते.मोत्यांसारख्या अक्षरावरून मायाचे चिमुरडी बोटे फिरत होती.तिला याचे अप्रूप वाटत होते.आपले बाबा किती हुशार आहेत.त्यांच्या डायरीचे पान न पान तिने एका बैठकीत वाचून काढले.कारण,लेक बापावर गेली होती.तिने बाबांच्या लेखनशैलीचे बारकाईने निरीक्षण केले.तिला त्यात खूप गोडी वाटली.आपल्या भावाचे,प्रविणदादाचे ही अक्षरही किती सुंदर आहे..जणू पुस्तकच टाईप३ केलेले आहे. किती एकसारखे...दोघांच्याही अक्षरांचे कौतुक,अभिमान अन् हेवा वाटला. अन् तिने मनोमन ठरवले की,आपणही भरपूर पुस्तके वाचायची अन् त्यांच्या नोंदी आपल्या वहीत करून ठेवायच्या.लेखनाने आत्मसमाधान लाभते.मन व्यक्त करण्याचे उत्तम साधन म्हणजे लेखन,हे तिला पटले होते.

सौ.प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे, ४४

वाचनाची गोडी लागली की,आपोआप लेखनाची ही गोडी लागते.पुस्तकांसारखा दुसरा मित्र नाही.पुस्तके हीच आपली मित्र....डॉ.बाबासाहेब आंबेडकरजींनी पुस्तकांशी का मैत्री केली असेल याचे गमक तिला आता कोठे उमगले.अन् तिची कळी मोहरली.नव्या प्रेरणेने,उत्साहाने,जोमाने तिने मनाशी ठाम निश्चय केला अन् बाबांकडून पन्नास रुपये घेवून एक छान डायरी घेवून आली.कारण तिला ही मनातील भावनांचा लेखनाने श्री गणेशा करायचा होता.चांगल्या कामाला उशीर नकोच.

तात्पर्य:- वाचनाने ज्ञानात वाढ होते,तर लिखाणाने मन रिते होते.

# थोडेसे मनातले...

**ज्योतिर्मय साहित्य**

अलीकडे सोशल मीडियावर एखादी आनंदी किंवा दुःखाची घटना घडली तसेच सण समारंभ, दिनविशेष असेल तर भरभरून कविता, लेख, चारोळी इत्यादी कोणत्याही प्रकारचे स्टेटस, पोष्ट जिकडे तिकडे दिसत असतात.व्यक्त होणे ही जरी माणसाची सहज प्रवृत्ती असली तरी त्याचा अतिरेक घुसमटून टाकतो.. (मी पण या मध्ये क्वचित नक्की असते.. नाहीतर तुम्हीं म्हणाल..

लोका सांगे ब्रह्मज्ञान स्वतः कोरडे पाषाण...

पण काही बाबतीतली उर्मी आणि काही बाबतीत माझा नाईलाज असतो.. जसे की कुठलाही हिंदू सण आला की भरभरून शुभेच्छा येतात त्यांना प्रतिक्रिया न देणे हे उर्मटपणाचे लक्षण वाटू शकते. त्यामुळे मी ही नक्कीच या सगळ्यांवर व्यक्त होते पण अलीकडे जिथे शक्य आहे तिथे वाहवत चाललेल्या विषयावर कमीत कमी लिहिणे किंवा आपल्या लेखनाचा, विचारांचा ओघ दुसऱ्या विषयाकडे वळवणे याचा प्रयत्न नक्की करते..




सगळे बंद करणे ना आपल्या हातात आहे, ना आपल्याला त्या वर बोलण्याचा अधिकार आहे.. पण ती खिडकी काही वेळाकरीता बंद करून आपल्या मनातले वेगवेगळे कप्पे उघडू शकतोच की..त्या कप्प्यात कधी एखादा छान पदार्थ करून सगळ्यांना खाऊ घालणे, आवडते पुस्तक वाचणे, गाणी ऐकणे ताल धरत गुणगुणने, निसर्गात रमणे आपल्याला ज्यांना भेटून, बोलून आनंद मिळतो त्यांना भेटणे किंवा त्यांच्याशी संपर्क साधणे अशा कितीतरी गोष्टीने आपला आनंद जपू शकतो आणि परत ती तात्पुरती बंद केलेली खिडकी उघडणे तर सहज शक्य असतेच की..

माझा हा विचार तुम्हांलाही पटतोय का? तुम्हीं काही वेगळे सुचविले तर त्याचे मनापासून स्वागत आहे..

***



## इंदापुरी निखारे

### FIR




**ज्योतिर्मय साहित्य**

सर नमस्कार...
येऊ का आत?
एक तरुणी...
पोलिस स्टेशन मध्ये...
अतिशय आदराने विचारत होती...
ती तरुणी...
अस्ताव्यस्त कपडे... विस्कटून गेलेले केस...
अधिकाऱ्याच्या लक्षात लगेचच...
या या... हं, बोला...
खूप खूप आभार सर...
नोंदवायची आहे...
काय झाले?
मी शेतातून... काम संपवून... अचानक...
कोण होता? ओळखता?
मजाच झाली की म्हणजे...
मस्त संध्याकाळचा मंद मंद वारा...
सूर्य आणि चंद्र दोघांची किरणे...
मस्त साथीला.. कालव्याच्या पाण्याचा संगीतमय ...
प्रफुल्लित करणारा मधुर आवाज...
मस्तच मजाच मजा...
सर, बलात्कार झाला आहे माझ्यावर...
हो ते नोंदवले आहे ना...
पण वातावरण फारच छान असणार...
काही मुली, बायांवर होतात ना... फार भयंकर... कपडे फाडतात... मारहाण करतात... कधी कधी तर... मारुन टाकतात, जाळून पण टाकतात...
तू खूपच भाग्यवान ... अगं, अशी मजा...
फायव्ह स्टार हॉटेल मध्ये पण नाही ...
जा आता तू... केली आहे.. तुझे काम संपले...
कुठं उगीच चौकात, रस्त्यावर बसू नको ...
माझ्यावर अत्त्याचार झाला म्हणून ...
उगीचच तुझं जंतर मंतर होईल...
बाकीच्यांना तेव्हढीच गंमत जंमत...
अर्थात तू काय करणार? तू थोडीच प्रसिद्ध आहे...
कोण कुत्रं पण विचारणार नाही... म्हणून फक्त सल्ला... आणि तुला समाधान वाटावे म्हणून...
हे डोळ्यातून दोन अश्रू... आणि हळहळ पण...
काळजी घ्यावी...
आम्ही पूर्ण जबाबदारीने काम करत असतो...
आम्हाला आदेशच आहे...
अशा प्रकरणात संवेदनशीलता दाखवावी...

# बरेच राहून गेले आहे.......!

**ज्योतिर्मय साहित्य**

आयुष्यात काहीतरी करायचं राहून गेलं या विषयावर लिहायचं म्हणताच मला ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत यांची बाहुली ही कविता आठवली . त्यातील काही ओळी

एक बाहुली हरवते तेव्हा दुसरीसाठी हटून बसते;

नवी मिळता,नाचता नाचता ती ही कुठे हरवून जाते.

किती किती नि कसल्या कसल्या बाहुल्या माझ्या हरवुन बसल्या!

वरील विषयाशी या ओळींचा काय संबंध? असं वाटतं असेल तुम्हाला. पण या ओळींचा अर्थ लक्षात आला की समजेल. कवयित्री इंदिरा संत यांनी या कवितेत माणसाच्या इच्छांना बाहुलीची प्रतिमा दिलीय. आलं लक्षात? आपली एखादी इच्छा पूर्ण झाली किंवा निसटून जरी गेली तरी दुसरी इच्छा तयारच असते.

अशा इच्छा इंदिरा संत यांच्या कवितेत बाहुलीच्या रुपात येतात. या इच्छा एकट्याने येत नाहीत तर इच्छांसोबतच येतात त्या अपेक्षा.

आपल्या आयुष्यात आपल्याला हवे तसे परिवर्तन घडून यावे, म्हणून आपण अपेक्षा करत असतो. यापेक्षा कधी आपल्या मित्र-मैत्रिणींकडून असतात, कधी जोडीदाराकडून, कधी नातेवाईकांकडून, तर बऱ्याचदा या अपेक्षा आपण आपल्या स्वतःकडून करत असतो.

अपेक्षांना अंत नसतो. आपल्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात यासाठी जो तो आपापल्या परीने प्रयत्न करत असतो.

निसर्गाने सृष्टी निर्माण करत असताना अनेक प्राणी अनेक सजीव घडवले पण माणसाला मात्र कलेचे, बुद्धीचे वरदान दिले.

माणसाला विचार करता येतो इतरांच्या भावना, वेदना समजून घेता येतात. निर्णय घेता येतो. माणसामध्ये नवनवीन गोष्टी शिकण्याची करण्याची क्षमता आहे. अशा नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी माणूस प्रेरणा देऊही शकतो आणि घेऊही शकतो. इतर प्राण्यांमध्ये या क्षमता नाहीत आणि म्हणूनच माणूस सर्व प्राण्यांपेक्षा वेगळा आहे बुद्धिमान आहे.



आपल्याला वैविध्यपूर्ण जीवन जगायला आवडते. पण असे वैविध्यपूर्ण जगताना आपण स्वतः जी नीतिमत्तेची चौकट निर्माण केली आहे, त्याच चौकटीमुळे आपल्याला मनासारखे जगता येत नाही आणि मग आपल्या आयुष्यात बरेच काही करायचे राहून जाते..

या ''बरेच काही'' मध्ये माझे काय करायचे राहून गेलेय? तर माझे जगायचेच राहून गेले आहे.

याविषयी आज मी लिहिणार आहे.

माणसाला आणखी एक वरदान मिळाले आहे ते म्हणजे नातेसंबंध. हे नातेसंबंध असतात ते एकमेकांना सावरण्यासाठी. एकमेकांना साथसोबत करण्यासाठी अशी धारणा आहे. पण वास्तव कसे आहे? तर नातेसंबंध असतात म्हणून आपण एकमेकांवर अवलंबून असतो. त्यातूनच मग अपेक्षा निर्माण होतात. वर म्हटल्याप्रमाणे या अपेक्षा आपण सर्वांकडून करत राहतो आणि मग या अपेक्षा पूर्ण करण्याच्या नादात आपण जगणंच विसरून जातो. माझेही जगणे असेच राहून गेले आहे.

आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी नातेसंबंधांकडून अपेक्षा न करता अगदी स्वार्थ विरहित जगायचे राहिलेय. अपेक्षेविना नातेच नाही. निरपेक्ष नाते अनुभवायचे राहून गेले आहे.

एकमेकांना साथ देत देत पुढे जायचे राहून गेले आहे. नाती ही आपल्या स्वार्थी उपयोगासाठी नाहीत तर ती एक सपोर्ट सिस्टीम आहे. हे अनुभवायचे राहून गेले आहे. जोडीदारावर आपल्या आवडत्या गोष्टी लादायच्या. मी तुझा नवरा आहे, तू माझी बायको आहे.

सबब माझे तुझ्यावर प्रेम आहे.

यात जी हक्काची भावना आहे, मालकीची भावना आहे. त्या भावनेशिवाय जगायचे राहून गेले आहे.

आपण आपल्या माणसाला हक्काचा माणूस म्हणतो, त्याच्याकडू अपेक्षा करत राहतो आणि आयुष्यात संघर्ष निर्माण करतो. ''हक्काचा माणूस'' हा शब्द ज्याने शोधला त्याला दोषी ठरवायचे राहून गेले आहे.

अनेक गोष्टींचा अभ्यास करायचा होता. पण तो करावासाच वाटला नाही. अभ्यास करायचा राहून गेले आहे. त्यामुळे ज्ञान मर्यादित राहिले. अपुऱ्या ज्ञानामुळे कित्येक वेळा चुकीच्या गोष्टींविरुद्ध बंड करून उठायचे राहिले आहे. समाजात वावरताना भवताली असंख्य चुकीच्या गोष्टी घडताना दिसतात त्या प्रत्येक चुकीच्या गोष्टींना विरोध करायचे राहून गेले आहे. म्हणजेच सक्रिय सामाजिक हस्तक्षेप राहून गेला आहे.

निसर्गात भटकत असताना, निसर्गाच्या अधिक्षेत्रात अतिक्रमण करताना निसर्गाला नख लागते आहे पण निसर्गात माणसाने केलेल्या घुसखोरी विरोधात भाष्य करायचे राहून गेले आहे.

अपुऱ्या ज्ञानामुळे अनेकदा ख-याला खरे म्हणायचे राहून गेले आहे. काहीच राहून गेले नाही असा सूज्ञ विचार करायचे राहून गेले आहे. आपण अमर आहोत असे वाटून आपण अनेक गोष्टी करत राहिलो, प्रत्येकाकडून अपेक्षा करत राहिलो पण हे सगळेच पूर्ण होणार नाही असा विचार करायचा राहून गेला आहे.

अपूर्णता हेच जीवन आहे हे माहित असूनही पूर्णत्वाच्या शोधात आपण काय काय केले, किती धावपळ केली, आनंदाच्या शोधात काय काय गमावले याचा विचार करायचा राहून गेले आहे.



सविता सुनील कारंजकर

# मुलांचे बालपण हरवत चालले आहे का?

**ज्योतिर्मय साहित्य**

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसांकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना



सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५




## सलोनीचा सुट्टी प्लॅन

सलोनी आणि सुजीत हे बहीण-भाऊ, दोघात पाच वर्षांचे अंतर, बहीण मोठी आणि भाऊ लहान. खूप खेळकर आणि खोडकर स्वभाव असलेले हे दोघेजण भांडखोर मात्र अजिबात नाहीत.

धिंगाणा आणि मस्ती करणे हा तर सर्वच मुलांचा आवडता खेळ असतो. सोसायटीमधील सगळ्या मुलांशी

सलोनी आणि सुजितचे मस्त जमते.

याचे एक कारण होते, ते म्हणजे वादावादी न करणे, खेळीमेळीने, हसून खेळून रहाणे ‘‘या छान स्वभावामुळे हे दोघे बहीण-भाऊ सर्वांचे बेस्ट फ्रेंड होते. सलोनी आणि सुजितच्या आई-बाबांचा एक नियम होता

तो म्हणजे ‘‘ वेळेनुसार सगळ्या गोष्टी करायच्या‘‘.

म्हणजे ‘‘शाळेच्या दिवसात अभ्यास, ट्युशनकलास,

यांना जास्त वेळ द्यायचा, आणि रविवार, सुट्टीचे दिवस‘‘ या दिवशी एकदम मौज-मजा करायची.

आणि उन्हाळ्याची सुट्टी आली की अभ्यास, शाळा हे विषयच नाही, सुट्टी एन्जॉय करायची.

सलोनी आणि सुजीत दोघेही यानुसार वागतात.

शाळेच्या दिवसात फक्त संध्याकाळी खेळायचे ईतर वेळी मित्रांनी बोलावले तरी ते जात नाहीत. पण म्हणून काही ते दोघे नाराज होत नाहीत.

कारण त्यांना माहिती आहे की, आपल्याला खेळण्यासाठी बंधने मुळीच नाहीत, पण कधी खेळायचे ‘‘याचे मात्र नियम आहेत.

सलोनीच्या सहवासात राहुन तिच्या काही फ्रेंड्सना ही सवय आवडली होती, काही जणांनी स्वतः असेच वागण्यास सुरुवात केली. या फ्रेंड्सच्या आई-बाबांनी सलोनीच्या घरी येऊन तिच्या आई-बाबांजवळ कौतुक करीत म्हटले, सलोनी थँक्यू ग !

तुझ्यामुळे आमची मुले, तुझे फ्रेंड छान वागत आहे!

वार्षिक परीक्षा संपली आणि सुट्टीचे दिवस सुरू झाले, शाळेच्या दिवसात घरात रहाण्यास फार कमी वेळ मिळतो, म्हणून सलोनीच्या मनात आले की,

आपण आईला सुट्टीत आराम करायला लावायचा, सुजितच्या मदतीने घरातली कामे करण्यास शिकायचे, मोठी मोठी काम आई नाही करू देणार हे मान्य, मग छोटी छोटी आणि किरकोळ काम तर करूच शकतो की आपण. मागच्या वर्षी आज्जी आली होती सुट्टीत, तेव्हा ती म्हणाली सलोनी, बाहेर बाहेर रमण्यात फार आनंद नाही, त्याचा कंटाळा येतो, त्यापेक्षा, आपण आपल्या घरात राहून आनंद मिळवावा, घर स्वच्छ, नीट-नेटके ठेवणे यासाठी स्वतःच्या हाताने सगळी साफसफाई करून तर पहा, मग बघ आपलेच सुंदर घर पाहून सगळे खुश तर होतीलच, त्यापेक्षा आपले मन अगदी प्रसन्न आणि आनंदीत होते.

खाण्याचे आयते पदार्थ मागवून खाणेच बंद केले पाहिजे‘‘,

असे न करता, हेच पदार्थ घरी बनवून पहावे, चुकत चुकत आणि शिकत शिकत ‘‘गोष्टी करण्यात फार मोठा आनंद असतो‘‘, हे घरात राहून कळू लागते.

या सुट्टीत आजी येऊ शकणार नव्हती, पण तिच्या सूचना तर लक्षात होत्याच की..

सलोनीच्या मनात विचार आला- या सुट्टीत बाहेरच्या कोणत्याही कॅम्पमध्ये, शिबिरात, छंद वर्गात जाण्याऐवजी आपल्याच घरातल्या शिबिरात आईकडून नव्या गोष्टी शिकून घेऊ या !

सुजितला त्याच्या दिदीची आयडिया जाम आवडली‘‘

आई-बाबांच्या समोर दोघांनी सुट्टीचा हा प्लॅन सांगितला,

आई-बाबांना अर्थातच खुप आनंद झाला.

बाबा तर म्हणाले- तुमच्या प्लॅन मध्ये मी जमेल तसा ऍक्टिव्ह रहाणार आहे रे मुलांनो.

आईने सलोनी, सुजितला सुट्टीच्या छान ‌प्लॅनबद्दल शाबासकी दिली.

## अजिंक्य साहित्य संगम सातारा काव्य संमेलन आणि पुरस्कार सोहळा दिमाखात साजरा



**ज्योतिर्मय साहित्य**

**सातारा** – अजिंक्य साहित्य संगम सातारा आयोजित काव्य संमेलन सोहळा स्वराज कॉन्फरन्स हॉल कोडोली इथे संपन्न झाला. सुरुवातीला ग्रंथ दिंडीने सुरुवात होऊन पाहुण्यांचे स्वागत झाले. दिप प्रज्वलन करून विद्येची देवता सरस्वती पूजन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून या दिमाखदार सोहळ्याची सुरुवात झाली. प्रथम जवळजवळ आठ पुस्तकांचे प्रकाशन आणि नंतर विविध विभागातील पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

पलपब साहित्य परिवार आयोजित अजिंक्य साहित्य संगम काव्य संमेलन सातारा आयोजित या कार्यक्रमात सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक. निनाम सातारा यांच्या धुक्यातील चांदणे या पुस्तकाला साहित्य प्रेरणा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक मा. अनिल बोधे सर, मा. सूर्यकांत शिंगटे सर मा. प्रदीप कांबळे सर ज्येष्ठ लेखिका मा.रेखा दिक्षित मॅडम, मा.हनुमंत चांदगुडे सर मा.अश्विनी नलगे मॅडम मा. कणसे सर, मा.विजय वेटम सर, पलपब पब्लिकेशन च्या सर्वेसर्वा मा. लीना पाटील मॅडम मा.सिद्धार्थ पाटील सर पल पब महाराष्ट्र अध्यक्ष मा. किरण तोडकर सर, सातारा समिती अध्यक्ष मा. विजय कदम सर पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मा.संदिप पवार सर आणि संपूर्ण सातारा कार्यकारणी समिती, तसेच पलपब परिवारातील अनेक अधिकारी पदाधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.



## अधुनिक केसरीचा पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**देवगड** – दैनिक आधुनिक केसरीनी दत्तात्रेयांचे अधिष्ठान देवगड येथे महाराष्ट्राचा आयडॉल या पुरस्कारानी विविध क्षेत्रातील मान्यवरांनां दिनांक १९ में रोजी गौरविण्यात आले. देवगड दत्तपिठाचे श्री.भास्करगिरी महाराज , सुप्रसिद्ध कविवर्य श्री.इंद्रजीत भालेराव मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष श्री.वसंत मुंढे आधुनिक केसरीचे सर्वेसर्वा श्री. प्रभू गोरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यानंतर त्यांनी आपल्या भाषणांनी सर्व श्रोतृवर्गानां मंत्रमुग्ध केले.शेवटी कविवर्य इंद्रजीत भालेराव यांनी सादर केलेल्या त्यांच्या कवितांनी साऱ्यांचेच डोळे पाणावले.

तीसहून अधिक कलागुण आत्मसात केलेले कलावंत सुधीर कोर्टीकर यांना सपत्नीक महाराष्ट्राचे कलारत्न म्हणून गौरविण्यात आले. महाराष्ट्रातील अनेक क्षेत्रातील १५ मान्यवरांनां शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आले.

अधुनिक केसरीच्या पुरस्कार सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी देवगडचे सुधीर चव्हाण, सरपंच अजय साबळे, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र शहापूरकर, संजय व्यापारी, विलास शिंगी सौ.सोनाली गोरे, यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व उपस्थितांना शेवटी पंचपक्वान्नाचे भोजन देवून दैनिक अधुनिक केसरीनी साऱ्यांचीच मने जिंकली.

## आनंदाच्या डोही आनंदी तरंग...

५ जून २०१९ ते ११ जून २०१९ कालावधीत जगात आनंद व सुखाचा इंडेक्स जास्त आहे आशा भूतान देशाच्या प्रवासाचा बेत माझे वर्गमित्र डॉ.आबा देशपांडे यांनी आखला!आबा ची सुन सौ.शिखा पुर्वी पर्यटन व्यवसाय करत होती. गुळवेलकर, होनाळीकर, शेजवळे, औरादकर, किल्लेदार, शेट्टी, विश्वास मोरे व त्याची भगिनी व तिचे मिस्टर व आम्ही दोघे जण प्रवासात सहभागी होतो. सौ.शिखाने आमच्या पर्यटनाचे नियोजन अत्यंत उत्कृष्ट व पध्दतसीर केलेले होते. त्या प्रमाणे पशुवैद्य मित्र आपल्या सहचारणी सह १९ व्यक्ती पुण्यातून विमानाने कलकत्ता व त्यानंतर भूतान देशात विमानाने पोंहचलोत. पारो हे विमान स्थळ दोन हिमालयाच्या पर्वतमय भागात आहे. उंच उंच हिमालयाची शिखरे व त्याच्या सपाट पायथ्याला असलेलें पारो एअरपोर्ट कांही अंतरावर स्वच्छ पाण्याची नदी सुंदर नजारा पाहण्यात आला. इमिग्रेशन ऑफीस मध्ये पुढील प्रोसीजर पूर्ण करुन टॅक्सी मधून आरक्षित केलेल्या लॉजवर गेलो होतो.

भारताचा मित्र देश असल्याने पासपोर्ट ची गरज नाही. आधार कार्ड किंवा व्होटर आयडी ओळख म्हणून चालते. लॉज वर सामानाची ने आण करणाऱ्या तरुणीच होत्या. काम करणार्यात तरुणापेक्षा तरुणींची संख्या आधिक आहे. रात्रीच्या वेळी सुध्दा तरुणी सुध्दा भयमुक्त वातावरणात काम करतात !

सर्व शासकीय आणि खाजगी व्यवसायात काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांना एक ड्रेस कोड नियोजित केलेला आहे. पर्यटन व्यवस्थेत गाईड, ड्रायव्हर, हॉटेल मध्ये काम करणारे काम करणारे स्त्री-पुरुष ही आपल्या राष्ट्रीय पोषाखातच असतात. एक वंश परंपरेने राजशाही पध्दतीचा अवलंब करणारे नागरिक आपल्या राजा बाबत नितांत प्रेम व आदर बाळगून असतात.१९०७ पासून वांगचुंग राजघराणे प्रस्तापित झालेले आहे. पंतप्रधान मात्र लोकशाही पध्दतीने निवडला जातो. थिम्पू शहरात भव्य राजवाडा आहे. राजघराण्याचे फोटो हॉटेल उपहारगृह, दुकानात, व कार्यालयात ही पहायला मिळाले. गाईड,उपहारगृहाचे वेटर्स कोणत्या ही टिप्स ची अपेक्षा करत नाहीत. पर्यटकांच्या बरोबर सौदार्य पुर्वक वागणूक पाहायला मिळते. भारतिया बाबत सर्वांच्या मनत स्नेहपूर्ण अत्मियतेचा भाव. राजघराण्याची भारत सरकारचे घनिष्ट व सच्या मैत्रीचे नाते आहे !




भूतान देशात ७५% बौध्द व २२% हिंदु जन संख्या आहे. शांतता प्रिय असलेला देश हाम रस्त्यावर चालणारे वहाने विना हॉर्न असतात. या देशात रस्त्यावर रहदारी साठी ट्राफीक सिग्नल नाहीत. पण ट्राफीक पोलीस हातवारे करत वाहतूक नियंत्रण करतात. पादचारी झेब्रा क्रॉसिंग वरुनच रस्ते ओलांडतात.तसे पायी चालणार्या चे प्रमाण अधिकच आहे! व वहाने झेब्रा क्रॉसिंग वर कमी गतीने मार्गस्त असतात. एका दृष्टीने पायी चालणार्या व्यक्तीचा आदरच करतात! शहरात वहानाची वेग मर्यादा तासी ३० कि.मी.असते.कोणते ही वहान हॉर्न वाजवून ओव्हर टेक होत नाही.सहा दिवसा च्या प्रवासात रस्त्या वर किंवा इतरत्र वाद आमच्या निदर्शनास आले नाहीत! पार्कीग स्पेस शिवाय इतरत्र गाडी पार्क करायला बंदी आहे! एका दृष्टीने महात्मा बूध्दांचा शांततेचा संदेशच जगाला देत आहेत...!

रस्त्यावर कोठे ही घाण, दुर्गंधी युक्त घाण वातावरण पाहिले नाही. तसेच रोड लगत कचर्याचे ढीग,कचरा कुंडी दिसल्याच



नाहीत. तसेच कोठेही प्लेक्स प्रदर्शन नाही ! रस्त्यावर प्लास्टीक बॉटल, पिशव्याचे ढीग दिसून येत नाहीत. भूतान मधील सर्वच इमारती भूतान शैलीत बांधलेल्या असतात. थिम्पु, फुन्शोलींग,पारो व पूनाखा ही प्रमुख शहरे. थिम्पू हे राजधानीचे शहर.त्यामुळे तेथे राजवाडा, संसद भवन, सर्वोच्य न्यायालय असून हे शहर थिम्पू नदीच्या काठावर वसलेलं आहे ! स्वच्छ व अवघळत वाहणारे स्वच्छ पाणी आहे व त्यावर जवळपास ८०० मिटर लांबीचा झुलता पूल सुस्थितीत आहे ! शहरातर औधोगिक कारखाने नसल्याने नद्या व हवा प्रदूषण मुक्त आहेत! पर्वतीय क्षेत्र वगळता इतर ठिकाणी शेती पिकाची लाघवड केली जाते.सेंद्रिय पध्दतीची शेती करतात.

तसेच अहिंसेच्या मार्गावर चालणार्या देशात किटक नाशके वापरावर बंदी आहे.तसेच मांस, अंडी, मासे विक्रीची दुकाने व कत्तलखाने ही पाहण्यात आले नाहीत. पण मांसाहार करण्यास बंदी नाही. भात, मक्का, पनीर, पकोडे, नुडल्स, मोमोज, मास व मासे हा त्यांचा आहारातील प्रमुख घटक आहेत. तीरंदाजी हा राष्ट्रीय खेळ आहे.कांही ठिकाणी रिव्हर रॉप्टींग सारखे धाडसी खेळ प्रवास्या च्या आनंदा साठी सुविधा केलेली आहे. पण त्याचे चार्जेस परवडणारे नाहीत. पाच दिवसाच्या भूतान टूर मध्ये बरीच बौध्द मंदिरे पाहण्यात आली.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559